# र स रा ज

## खंड क्र १

### ( रसराज अंकांचा बांधीव खंड )

| अंक क्रमांक | वर्ष |
|---|---|
| १. | १९७४ - १९७५ |
| स्मरणिका | १९८१ - १९८२ |
| २. | १९८१ - १९८२ |
| ३. | १९८२ - १९८३ |
| ४. | १९८३ १९८४ |

महत्वाची सूचना :- सदरचा खंड ग्रंथालयाबाहेर नेवू नये.
तसेच कसल्याही परिस्थितीत आतील मजकूराचे कात्रण काढू नये.

प्राचार्य.

SHRI. S. H. KELKAR COLLEGE OF ARTS,
COMMERCE & SCIENCE,
DEVGAD, DIST-SINDHUDURG
LIBRARY
This is valuable and
cannot be taken outside the
Library without the special
permission of the Librarian

DEVGAD COLLEGE OF ARTS AND COMMERCE,
DEVGAD, DIST- SINDHUDURG
LIBRARY
This work is valuable and cannot be taken outside the Library without the special permission of the Librarian

# वराज

## रणिका

७४-७५



देवगड महाविद्यालय,
कला व वाणिज्य, देवगड.

कल्याण प्रेस देवगड

# देवगड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

१६ ऑगस्ट १९७४ पासून ठेवीवर वाढविलेले व्याजाचे दर

| मुदत ठेवीचा प्रकार | व्याजाचा दर द. सा. द. शे. रु. पैसे |
| --- | --- |
| ९१ दिवस व त्यापेक्षां अधिक परन्तु ६ महिन्यापेक्षां कमी | ५–५० |
| ६ महिने व त्यापेक्षां अधिक परन्तु ९ महिन्यापेक्षां कमी | ६–०० |
| ९ महिने व त्यापेक्षां अधिक परन्तु १ वर्षापेक्षां कमी | ७–०० |
| १ वर्ष व अधिक परन्तु ३ वर्षापेक्षां कमी | ८–०० |
| ३ वर्षे व अधिक परन्तु ५ वर्षापर्यंत | ९–०० |
| ५ वर्षापेक्षां जास्त | १०–०० |

सेव्हिंग्ज ५–५०

★ सध्या असलेल्या मुदतीच्या ठेवीवर सुद्धां राहिलेल्या मुदतीसाठी नवीन दराप्रमाणे व्याज मिळेल.

★ रुपये १००००/– पर्यंन्त ठेवीचे प्रत्येक खाते विमा सुरक्षीत आहे.

## पिग्मी डिपॉझिट स्किममध्ये सामिल व्हा !

२५ पैशापासून १० रुपयापर्यन्त रोज बचत करून ५ वर्षानंतर– खालीलप्रमाणे रक्कम परत घ्या.

| दररोज भरावयाची रक्कम | ५ वर्षानंतर मिळणारी रक्कम |
| --- | --- |
| १) ०–२५ | ५२२–६२ |
| २) ०–५० | १०४५–२५ |
| ३) १–०० | २०९०–५० |
| ४) २–०० | ४१८१–०० |
| ५) ५–०० | १०४५२–५० |
| ६) १०–०० | २०९०५–०० |

लवकरच रिकरींग डिपॉझिट स्कीम (मासिकठेव योजना) चालू करीत आहोत.

बाहेरगांवचे चेक्स, हुंड्या, वसुलीसाठी स्वीकारण्यात येतात तसेच अल्पकमिशन मध्ये बाहेरगावचे चेक्स देण्यात येतात

सर्वप्रकारचे बँकिंग व्यवहार केले जातात.

अधिक माहितीसाठी एकवेळ समक्ष ऑफिसला भेट द्या.

जी. बी. लोंबर
सेक्रेटरी

पी. आर्. जोशी
चेअरमन

*With Compliments From*

PRINCIPAL
**Devgad College Of Arts & Commerce**
DEVGAD

# रसराज
## स्मरणिका
## १९७४-७५


**संपादक मंडळ**
प्राचार्य– गोपाळराव मयेकर, अध्यक्ष
प्राध्यापक– पुरुषोत्तम गोठोसकर, सभासद
कुमार– आत्माराम जाधव, विद्यार्थी सभासद

**प्रकाशक**
विद्यार्थी मंडळ, देवगड महाविद्यालय

**व्यवस्थापक**
प्राध्यापक– सुधीर झांटये

**मुद्रण-स्थळ**
कल्याण सहकारी मुद्रणालय, देवगड


## देवगड महाविद्यालय, कला व वाणिज्य, देवगड

# RASARAJ
## SOUVENIR
## 1974-75
## DEVGAD COLLEGE OF ARTS & COMMERCE, DEVGAD

# अनुक्रमणिका-


संपादकीय

कल्याणकारी राजा शिवछत्रपती
प्रा. ल. दा. गोलतकर १

राष्ट्रभक्त संत स्वामी स्वरूपानंद
कुमार- व. कृ. मराठे ५

" What I Think of Poetry."
प्रा. पी. एस् गोठोसकर १३

घर की शक्ती
कुमार- इ फ कादरी १७

फसवणूक- एक कला !!
कुमार- आ. य जाधव २१

Role of Non Officials In Co-operative Movement.
प्रा. एस् एस्. झांटये २९

वार्षिक वृत्त विशेष ३७

Our Society ४१

प्रेम आणि मरण
सुधीर ४३

दैव जाणिले कुणी
कुमार- श. ज. सावंत ४५

ऋणनिर्देश ५२

# सम्पादकीय–

प्रिय वाचकहो,

श्री. शिवछत्रपती राज्यारोहण त्रिशतसंवत्सरी वर्षात 'रसराज' स्मरणिका रसिकांच्या हाती देताना आम्हाला अत्यानन्द होत आहे.

उचित साध्याच्या प्राप्तीसाठी सतत प्रयत्नशील रहाणे हे मानवाचे काम असले तरी ते फलद्रुप करणें हे दैवाचे काम! ग्रीष्माच्या रखरखत्या उन्हात, तृषेने कासाविस झालेल्या पक्ष्याला तृप्त करण्यासाठी अचानकपणे, वैराण वाळवंटात निर्मळ निर्झर प्रादुर्भूत व्हावा त्याप्रमाणेच आषाढीच्या शुभमुहूर्तावर, मेघांच्या गर्जनेत, थोरांच्या आशिर्वादात 'देवगड महाविद्यालय' अवतरले. अनेक विचारवंतानी श्रमाचे घण घालून, टपटप ओघळणाऱ्या जलथेंबातून एका महान-पवित्र ज्ञान गंगेला जन्म दिल्याचे हे एक मूर्तिमंत प्रतीक आहे! तिच्या उगमाचे स्वरूप जरी आज गंगोत्रीप्रमाणे असले तरी प्रवाह हा विशाल होतच राहिल.

रत्नागिरी जिल्ह्याचा मुकुटमणी म्हणजेच 'रसराज' सप्तरंगाच्या मिश्रणाने जसा तेजस्वी, सर्वश्रेष्ठ, पवित्र शुभ्रवर्ण बनतो, तसाच गरिबांपासून श्रीमंतापर्यन्त, वाङमयापासून क्रीडाक्षेत्रापर्यन्त, निवडुंगापासून आम्रवृक्षापर्यंत सारे रस येथे साचले जातात नि तृप्तीच्या ढेकरामधून वाखाणला जातो. तो 'रसराज'! ज्या दऱ्या खोऱ्यात रसराज निनादतो आहे त्याच कडेकपारीतून गर्जला-अमुचा शिवबा! दोघेही शिरोमणी, कोकणचे... अमर महाराष्ट्राचे!! 'त्रिशताब्दी शिवराज्याभिषेक' अखंड वर्षभर भारतात साजरा केला जात आहे त्या शिवरायांची प्रतिमा साक्ष ठेऊन साहित्य सुमनांची प्रथम मालिका त्यांच्याच चरणी अर्पण करीत आहोत.

साहित्यप्रेमी रसिक हो, वसन्ताच्या आगमनापूर्वीच, आधिरलेल्या साहित्यप्रेमी रसनेला 'रसराज मधील रसाचा... माधुर्याचा अनुभव येवो अशी आशा व्यक्त करून आपल्या सद्भावनांची अपेक्षा करतो.

— सम्पादक

*With Compliments from*

## THE BELGAUM BANK LIMITED

**Regd. & Head Office: Raviwar Peth, Belgaum.**

**BOARD of DIRECTORS.**

Shri. **H. S. Kulkarni** B. A. Shri. **M. G. Herekar,** Landlord.

Shri, **S. V. Kalghatgi,** Merchant. Shri. **V. Y. Kulkarni,** B. Ag.

Invest in our Deposit Special Scheme and earn Monthly Interest at the following attractive rates.

| | |
|---|---|
| For deposits for 1 year and above but less than 3 years... | 8% p. a. |
| For deposits for 3 years and above but up-to and inclusive of 5 years... | 9% p. a. |
| For deposits above 5 years... | 10% p. a. |

Enquire at any of our 46 Branches-Our Bombay office at Mandvi. Bombay-9 & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore-2.

**S. Y. Kamat.**
General Manager.

" शिवछत्रपती त्रिशत सांवत्सरिक वर्षा प्रसंगी शिवचरित्रा पासून सर्व भारतीयांना अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. प्रत्येकाने राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सहभागी होणें उचित आहे. हिंदवी स्वराज्याची स्थापना, विस्तार व रक्षण करताना शिवप्रभुनी कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा दृष्टिकोन ठेवला होता. त्यांच्या कर्तृत्वाचा इतिहास भारतीयाना प्रेरणा देणारा आहे "

# कल्याणकारी राजा शिवछत्रपती



परोपकाराचिया रासी । उदंड घडती जयासी ।
तयाच्या गुणमहत्वासी । तुलणा कैची ॥

—श्री समर्थ रामदास

महाराष्ट्रात छत्रपतीने अतुलपराक्रम करुन सार्वभौमसत्तेची स्थापना केली. हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सर्व मराठे एकत्र येऊन त्याचे दृढिकरण व्हावे असाच मार्ग त्यानी आखला होता. मराठा शद्ब मराठ्यापूरताच

प्राध्यापक : लक्ष्मण दाजी गोलतकर
एम्. ए., बी. एड्., डी. पी. एड्.

नव्हता. ब्राह्मण, मावळे, हेटकरी, भंडारी व कोळी हेच काय पण मुसलमान व ख्रिस्त यांचेही सहाय्य होते. शिवाजी महाराजानी संघशक्ती वाढविली. सर्वजाती जमातीचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घेतला. आपण या राष्ट्राचे घटक आहोत, राष्ट्रसेवेकरीतां सर्वस्व खर्च घालणे हे आपले कर्तव्य आहे. अशी भावना लोकात निर्माण केली. बहुजन समाजात दिव्य स्फूर्ती निर्माण केली. जनतेस भरपूर पराक्रम क्षेत्र निर्माण केलें. जनतेला हिंदुपद पातशाहीची इमारत उभारण्यास व तिचे संवर्धन करण्यास प्रवृत्त केले.

शिवशाहीत सर्वधर्मांना पूर्ण स्वातंत्र्य होते. हिंदवी स्वराज्य निर्मिताना स्वधर्मरक्षण हा प्रधान हेतु असला तरी परधर्मीयाना, मुसलमानाना त्रास दिला नाही. सर्वधर्मीयाना समतेने वागविण्याचा बाणा होता. पारलौकिक कल्याणार्थं हिंदु देवस्थानांना देणग्या दिल्या. देवस्थाने व तीर्थस्थाने याना मदत केली. त्या प्रमाणे मुस्लीम देवस्थाने, मशिदी पीर याना उदार हस्ते देणग्या दिल्या. इनामें व नेमणूका दिल्या. हिंदवी स्वराज्यात मुसलमानीं प्रजा हिंदुप्रमाणे सुखासमाधाने रहात होती त्याच्या सैन्यात, नाविक दलात मुसलमानी सेनानी व सैनिक होते. मुख्य दर्यासारंग मुसलमान होता. पतितपरिवर्तन हा मार्गही शिवाजीने अवलंबिला होता. देशातील उत्कृष्ट बुद्धिमत्तेची माणसे मिळवून ती त्याने आपल्या पदरी ठेवली. समर्थ व निष्ठावंत माणसे त्यानी आपल्या भोवती गोळा केली होती शिवछत्रपतीचे वर्तन न्यायाचे, नीतीचे, पराक्रमाचे, स्वधर्मपरायणतेचे व परधर्म सहिष्णूतेचे होते.

# सुभाष मेडिकल स्टोअर्स

-: केमिस्ट अँण्ड ड्रगिस्ट :-

**देवगड**, जि. रत्नागिरी





आमचेकडे सर्व प्रकारची **औषधे** तसेच
साबण, चहा, अत्तरे,
बॅटरी सेल, बिस्कीटे,
व फौंटन पेनस्
माफक दरात मिळतात.

प्रोप्रा साटम बंधू
देवगड

राष्ट्रातील प्रजेला सुखी व स्वतंत्र केले. परस्त्रीस माते समान मानले. युद्धात पराभूत झालेल्या शत्रूपक्षातील जखमीना त्यानें दया दाखवून स्वगृही पाठविले. प्रथम स्वतः संकटात उडी घेऊन आपल्या देशाचीं सेवा करावयास शिकविले. दुष्टांचा कर्दनकाळ पण गरीबांचा कनवाळू त्यानी प्रजेवर अपत्यवत प्रेम केले. अहर्निश राष्ट्राची चिंता वाहीली

अनियंत्रित राज्यसत्ता असून सुद्धा आपला कारभार स्वैराचारी, जुलमी होऊ नये याची दक्षता घेतली सुराज्य व्यवस्थे विषयी ते आस्थेवाईक होते. त्यांच्या ठिकाणी कालाप्रमाणे बदलण्याची प्रागतिक वृत्ती होती. राज्यकारभारात अष्ट–प्रधान मंडळात स्थान देऊन प्रजाहिततत्परता दाखविली. राज्यव्यवस्थेला व्यवहार चातुर्य व दुरदृष्टी होती. लोकशाहीतील मंत्रीमंडळ पद्धतीचा स्वीकार त्यावेळी त्याने केला होता. प्रधानमंडळाची मते तो एकून घेत होता. मंत्रीमंडळाचा विश्वास संपादन करुन जनहित साधण्यात महाराज यशस्वी झाले. लायक व पराक्रमी माणसाना प्रधान मंडळात घेतले जाई. त्याना रोख वेतनें दिली जात. शिवाजीनें इनामे व जहागिरी ऐवजी भरपूर पगार देण्याचा प्रघात ठेवला त्यामुळे अधिकारी डोईजड होण्याचा संभव नव्हता. निवड काटेकोर व लायकी प्रमाणें होत असे. अधिकारी वंशपरंपरागत न नेमण्याचा हेतु होता. कामाची आखणी चोख असे. कौशल्य पाहुन बदलणें, मुलगा बापाप्रमाणे कार्यकुशल असेल तर त्याला बापाचाच अधिकार देणे. खालच्या पदावरुन वरच्या पदावर अनुक्रमाने नियुक्ती करणे, या गोष्टी शिवाजी काळजीपूर्वक करत असे एकाच प्रदेशात एकच अधिकारी फारकाळ ठेवित नसे.

शिवाजीकडे माणसांची पारख व योजकता बिनचूक होती. किल्ले स्वराज्याचे जीवप्राण होते. किल्ल्यावरील अधिकारी वेगवेगळ्या जातीचे असल्यामुळे प्रत्येकाचे परस्परावर नियंत्रण असे त्यामुळे फंदफितुरी होण्याची फारशी भीती नसे. शिस्त, कार्यक्षमता व प्रामाणिकपणा याला महत्व दिले होते.

छत्रपतीने रयतवारी पद्धतीचा जमीन महसुलाबाबत स्वीकार केला होता. रयत पैसा सरकारला भरणा करीत. त्यामुळे मध्यस्थाचा जाच होत नव्हता. वसुल करताना जुलुम जबरदस्ती होत नव्हती. चोर दरोडेखोर यांचा उपयोग शेतीसारख्या विधायक कार्यासाठी करुन घेतला जात असे. आपले वर्तन सुधारण्यास संधी दिली जाई. बहुजन समाजाच्या हितासाठी राज्य हाकीत असे. आयतखाऊ, वतनदार इनामदार, मध्यस्थ यावर त्याची करडी नजर होती. स्वारीच्या वेळी जनतेस, शेतकऱ्यास व स्त्रियास त्रास होऊ नये असा कडक ईशारा असे. लुटी केल्या असल्यातरी त्या वैयक्तिक स्वार्थासाठी नव्हे तर स्वराज्याच्या रक्षणासाठी, विस्तार व दृढीकरणासाठी आवश्यक होत्या. लुटीचे कडक नियम होते. त्यात उच्च नीतिमुल्यें होती. लुट सर्व सरकारी तिजोरीत टाकली जाईल याची दक्षता घेतली जाई. गोरगरीबांच्या निर्वाहासाठी दानधर्म व अन्नसंतर्पण केले जाई. स्वराज्यात पंडिताना आश्रय व उत्तेजन दिले.

शिवछत्रपतीनी रयतेला सुखी व समाधानी ठेवण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. मानवतेची शाश्वत मुल्यें सांभाळून मानवधर्माचे पालन केले. राजकारण, धर्मकारण व अर्थकारण यांचा त्रिवेणी संगम साधून नवराष्ट्रनिर्मीती केली.

आमच्या शुभेच्छा-



★ मे. अशोक इंडस्ट्रीज, देवगड ★
जि. रत्नागिरी



॥ हरिः ॐ तत् सत् ॥

# राष्ट्रभक्त संत
# स्वामी स्वरूपानंद

लेखक : वसन्त कृ. मराठे
प्रथम वर्ष वाणिज्य

तो दिवस १५ डिसेंबर १९०३ चा होता. मार्गशीर्ष वद्य द्वादशी होती ती. आज रत्नभूमी विशेष नटलेली होती. क्षितिजावर सूर्य अस्ताच्या मार्गावर होता आज क्षितिजावर रंगसंमेलन भरले होते. पावसाची आमराई मोहरण्याच्या मार्गावर होती. सर्व वातावरण मनमोहक होते. फक्त त्रास होता तो झोंबणाऱ्या वाऱ्याचा ! आज पावसच्या भूमीतून एक रत्न निघाले. रूक्मिणीबाईनी एक महान देशभक्त संताला जन्म दिला गोडबोले कुलतेजाचादीपच होता तो. तेच ते गोडबोल्यांचे रामभाऊ, आप्पा, तुमचे आमचे स्वामी स्वरूपानन्द !

ज्या घराण्यांत एखादा दैवी पुरूष जन्मतो, त्यापूर्वी त्या घराण्याकडून अमर्याद ईशसेवा घडत असते असा दैवी संकेत आहे. आमचे स्वामी ज्या गोडबोले घराण्यांत जन्मले त्या घराण्यांतून अशीच अमर्यादा ईशसेवा घडली होती. गंगाबाईना (स्वामीच्या आजी) निरपराध असता पतीच्या सावत्र भावाला अफू जास्त घातली गेली व तो निवर्तला म्हणून आपले रहाते घर सोडावे लागले. अशा वेळी केवळ दैवावर विश्वास ठेवून त्यांनी नरसोबाच्या वाडीला येऊन १२ वर्षे दत्ताची निःसीम सेवा केली. त्यांच्या सेवेचे फळ म्हणून पर्शरामपंताना (स्वामींचे आजोबा) ' तुमची लक्ष्मी नरसोबाच्या वाडीत फिरत आहे. तिला घरी आणा आणि सुखाने संसार करा. तुमच्या वंशात एक महान ईश्वरभक्त निर्माण होऊन, कुळाची कीर्ती दिगंती पसरेल ' असा दृष्टांत झाला. नंतर पर्शरामपंतांचा संसार बहरला. त्यांना दोन पुत्र प्राप्त झाले. एक सदाशिव

व दुसरे विष्णुपंत. विष्णुपंत हे सिद्ध पुरूषाचे पिता. ते विष्णुभक्त होते. त्यांनी घेतलेल्या विष्णुसहस्त्र नामाचे आणि त्या कुळातून झालेल्या झालेल्या एकंदर ईशसेवेचे पुण्य फळ म्हणजे 'आप्पा'!

चिमुकले आप्पा लहानपणापासून गोरे नाक, डोळे विशष नजरेत भरणारे, कोणालाही मोह पाडील अशी गौर कांती! एकंदरीत कोणाच्याही मनात हा बाळ भरे आणि त्यामुळे, 'असा बाळ लाभणें म्हणजे रूक्मिणीबाई तुमचे भाग्यच हो!' असे गांवातील इतर बायका म्हणत असत. लहानपणापासूनच आप्पांचे अभ्यास व देवभक्ती यांत विशेष लक्ष होते 'खेळत राहू नको, अभ्यास कर' असे घरची माणसे म्हणाली की, 'मी शाळेतच घरचा अभ्यास केला असे मार्मिक उत्तर आप्पांकडून मिळे व त्यामुळे घरच्या माणसाना गप्प बसावे लागे. पण या अभ्यासाबरोबर भरपूर खेळ, गमती–जमती, यांत आप्पा काही कमी नव्हते. 'महालक्ष्मीच्यावेळी घागरी घेऊन आप्पा फुंकू-सुद्धा लागत. अश्या अनेक गमती ते करीत. सायंकाळी आप्पांचे दोन्ही बंधु संध्येसाठी बसले की आप्पा सुद्धा त्यांच्याबरोबर बसत. आणि परवचा स्थोत्र आदि म्हणत असत. इतक्य लहान-वयांत सुद्धा आप्पांचे विचार मोलाचे होते. रात्री अंथरूणावर पडले की त्यांचे विचारचक्र सुरु होई 'ध्रुवाची आई, ध्रुव माझ्याएवढा असताना बोलली होती म्हणून तो वनांत निघून गेला. माझी आई पण मला खूप बोलायला हवी मग मी वनांत जाईन. देवाचे ध्यान करीन.

आमच्या शुभेच्छा—

टाकळे कन्सर्न्स, चिपळूण



卐 टाकळे ब्रदर्स, इलेक्ट्रीक कॉन्ट्रॅक्टर्स, चिपळूण.
卐 स्वरुप ट्रेडर्स, इलेक्ट्रीक सामान सेल्स् ॲण्ड सर्व्हीस.
卐 साउंड ऑफ म्युझिक रेडीओ विक्री व दुरुस्ती.
卐 आर्. एस्. टाकळे आणि कंपनी, सायकल डिलर्स.
卐 प्रकाश सायकल मार्ट, सायकल डिलर्स.

☎ १२८ चिपळूण

ध्रुवाला वनांत श्री भगवान विष्णु भेटले. मला पण तसेच भेटतील का ?, या विचारचक्रांत आप्पा झोपी जात.

आप्पा इंग्रजी ५ वी पर्यंत रत्नागिरी येथें शिकले व पुढील शिक्षणासाठी ते मुंबईला गेले त्यावेळी 'आनंदी' चाळीत आप्पांचे वास्तव्य होते. आप्पांचे थोरले बंधु गणपतराव यानी त्याना जून १९१९ ला आंग्रेवाडीतील आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयांत दाखल केले हे विद्यालय धार्मिक शिक्षण आवर्जून देत असे. आप्पांच्या वैचारिक घडणीला हे एक वरदान ठरले. या ठिकाणी असलेले घारपुरे मास्तर हे संस्कृतचे मोठे विद्वान असून त्याना अध्यात्माची गोडी व ज्ञानाची लालसा असल्यामुळे त्यांचा या होतकरु, अभ्यासू, संस्कृतची आवड व ज्ञानाची लालसा असलेल्या आप्पांवर लोभ जडला त्यानी आप्पाकडून पंचतंत्र, संस्कृत आदिंची तयारी करुन घेतली. वडीलानी आणि आजोबानी केलेल्या संस्कारामुळे त्याना गीतेचा छंद होताच आणि त्यात या मास्तरांचे मार्गदर्शन त्यामुळे आप्पांच्या या छंदाला विशेष चालना मिळाली. या काळात शहरांत होणारे कथा, किर्तन आदि कार्यक्रम ते चुकवित नसत 'आपण देशासाठी झटावे. शुल्लक स्वार्थामागे लागून आपण या देहाचा फक्त स्वत:साठीं उपयोग करतो हे बरोबर नाही. टिळक सावरकर यांसारखा आपला देह जन्मभूमीसाठी झिजवा' असे विचार आप्पाना भेडसावित. अशांत १ ऑगस्ट १९२० लो. टिळक निधनाच्या वार्तेने आप्पाना फार दुःख झाले तावडतोब ते सरदार गृहाकडे धावले. ना पाऊस ना ऊन कशाचीही त्यानी पर्वा केली नाही आपल्या नयनाश्रूंनी त्यानी टिळकाना श्रद्धांजली वाहिली. यानंतर आप्पा फार चिंतनशील व अंतर्मुख बनले, टिळकांचे त्यागी जीवन त्यांच्या डोळ्यापुढे तरळू लागले व आपणही देशासाठी काहीतरी करावे या विचाराने प्रेरित होऊन ते आपल्या गावी परतले गांधीजींचे अनुकरण त्यानी स्वीकारले व गांवात राष्ट्रीयशाळा व स्वावलंबनाश्रम यांची स्थापना केली. राष्ट्रभक्तीच्या कार्याला त्यांनी आपल्या गावापासून सुरूवात केली. गावातील लोकांवर सुसंस्कार व्हावे, लोक राष्ट्र प्रेमी व्हावे, म्हणून त्यानी राष्ट्रीय मेळा काढला 'प्रेम शांती गौरवार्थ, घ्या करी ध्वजास ह्या' या सारखी राष्ट्रभक्ति प्रेरक गीते त्यानी स्वत: रचली स्वावलंबनाश्रमात आप्पा स्वत: शिकवू लागले तेथे सुतकताई सुरु झाली. हळू-हळू विद्यार्थ्यांची संख्या ४०/५० वर गेली. पुढे मात्र, 'राष्ट्रीय शाळेत आपण मुलाना घातले तर आपगावर सरकारचा रोष येईल या विचाराने पालक मुलाना शाळेत पाठविनासे झाले. यातून फक्त २/३ विद्यार्थी शिल्लक राहिले'


— आमच्या शुभेच्छा —

दक्षिण रत्नागिरीत

प्रसिद्ध असलेले

श्री. भोळे यांचे

कोकण लाडू केंद्र

बाँबे गोवा रोड

चिपळूण उपनगर

(रत्नागिरी)

देवगड महाविद्यालयास आमच्या हार्दिक शुभेच्छा ! !

# देवगड तालुका सह. खरेदी विक्री संघ लि.
## देवगड जि. रत्नागिरी.

卐

नियंत्रित व अनियंत्रित दराच्या
कापडाचा पुरवठा
**सरकार मान्य कापड दुकान**

सर्व प्रकारच्या नित्योपयोगी मालाचा
रास्त भावांत पुरवठा करण्याकरितां
**ग्राहक वस्तु भांडार**

## – खत पुरवठा –

कृषि उद्योग विकास महामण्डळ व रॅलिज इंडीया लि. या कंपन्यांचे एकमेव वितरक.
**खत विक्रेत्यानीं स्पेशल कमिशनच्या नवीन योजनेसाठीं त्वरीत संपर्क साधावा.**

**महत्वाची सूचना** १) सध्या खतांवरील नियंत्रणे उठली आहेत. आवश्यक ती खतें परमिट अगर दाखल्या शिवाय कोणालाही घेता येतील.
२) स्पेशल कमिशनची सोय ३१ मार्च १९७५ पूर्वीच.

नियंत्रित माल व अन्नधान्यें यांच्यासह वाससामान, कीटकनाशकें, लोखंडी सामान इलेक्ट्रीक सामान यांचा पुरवठा करणारा मुख्य विभाग

## तसेच

दुभत्या जनावरांसाठीं महाराष्ट्र शासनाने पुरस्कृत केलेले उत्तम **सुग्रास** पशुखाद्य वापरा.

रा. रा. खानविलकर
मॅनेजर

श्री. मो. गोगटे
चेअरमन

त्याना त्यांनी मॅट्रीकपर्यंत शिकविले. ' जया-अंगी मोठेपण तया यातना कठीण! ' या न्यायानें आप्पाना घरच्या कठीण परिस्थितिमुळें प्रेसमध्यें खिळे जोडण्यापासून तो प्रुफे तपासण्या पर्यंत सर्व कामें करावी लागली. इतकेच नव्हेतर त्यानी डोक्यावरून मालही वाहिला. एकंदरीत या काळांत आप्पांचे जीवन म्हणजे मूर्तिमंत कष्ट व स्वावलंबन होते !

स्वामींचे मामा केशवराव गोखले याना अध्यात्माची आवड. त्यानी पुण्याचे श्री. बाबा-महाराज वैद्य यांजकडून गुरुमंत्र घेतला होता. आपला भाचा ' आप्पा ' याची लहानपणापासून अध्यात्माची आवड पाहून, ' याला जर योग्य गुरु मिळाला तर हा विशेष नावलौकिक मिळविल ' या विचाराने त्यानी बाबामहाराजांकडून आप्पाना ' सोऽहम् ' चा गुरुमंत्र देवविला. श्री. बाबामहा-राजांकडे जाताच त्यांच्या हातातील ज्ञानेश्वरीची जीर्ण पोथी पहाताच, 'मी माझ्या गुरुना वाचण्यास त्रास पडणार नाही अशी ठळक सुवाच्य अक्षरांत ज्ञानेश्वरी लिहून ती गुरुसेवा म्हणून अर्पण करीन ' असा निश्चय केला आणि खरो-खरच दीडदोन वर्षांत ही प्रत स्वामींनी बाबा महाराजाना अर्पण केली. त्यावेळचा आनंद अवर्ण-नीयच होय ! स्वामी जेव्हा जेव्हा गुरुसेवेची संधी मिळे तेव्हा तेव्हा ते गुरुसेवा करीत. त्यांनी आपली ' सोऽहम् ' चालू ठेवली होती पुढे आप्पाना असहकाराच्या कार्यात भाग घेतल्याने कैद झाली व एरवड्यास जेलमध्ये पाठविण्यांत आले. याठिकाणी स्वामींच्या ' सोऽहम् ' साधनेला भरपूर वेळ मिळाला. याठिकाणी आप्पा एका बाजूला ध्यानमुद्रा करून, दृष्टी नासिकाग्र किंवा अर्धोन्मीलित ठेवून दोन दोन तास पर्यंत कस-ल्यातरी आनंदात मग्न असत. हे पाहून बाकीचे लोक त्याना ' स्वामी ' म्हणत असत. परन्तु दैवी योगच तसा होता की ते पुढे ' स्वामी ' म्हणूनच ओळखले जाऊ लागले. राष्ट्रभक्तीने प्रेरित झालेल्या आप्पाना शिक्षेची काय पर्वा ! उलट त्यानी आपली ' सोऽहम् ' साधना नेटाने वाढविली. पुढे आप्पाना ' गुरुदक्षिणा ' म्हणून बाबा महा-राजाना ' नवरत्नहार ' अर्पण केला. तेव्हा आपल्या शिष्याची योग्यता समजून त्यानी, ' संसारग्रस्त दुःखी जीवाना परमार्थ प्रवण कर-णारा, मुमुक्षूना सन्मार्ग दाखविणारा, साधुसंतांना संतोष देणारा आणि आपल्या संप्रदायाचे वैभव वाढविणारा, स्वरुपाचा आनंद भोगणारा तू ' स्वरूपानंद ' झाला आहेस ! उठ, प्रापंचिक जीवाना भवबंधनातून सोडवायला ' सोऽहम् ' हंसावर आरुढ हो ! भगवद्‌भक्तीचा उपदेश मुक्त हस्ताने कर. पुढे तुझ्या हातून मोठे कार्य होणार आहे.' असे सांगितले व त्यापासून आप्पा ' स्वरुपानंद ' म्हणून ओळखले जाऊ लागले. स्वामीजींच्या योग्यतेची गुरुकडून मिळालेली ही पावतीच होती !

१९३४ साली स्वामींना जबरदस्त आजा-राचा तडाखा बसला. ' आपण यातून तरू शकत नाही ' असे वाटले. परंतु त्यांनी त्या सहा महिन्याच्या काळांत अखंड ' सोऽहम् ' ध्यास चालविला व त्यातून ते तरले, परन्तु कायमचे मात्र हळुवार बनले. या आजारानंतर स्वामींना जणूकाही नवजीवनच मिळाले. या आजारानंतर स्वामींनी ' अभंग ज्ञानेश्वरी ' ' गीता तत्व सार' ज्ञानेश्वरी नित्यपाठ,' ' संजीवनी गाथा,' आदि काव्ये लिहिली. याच आजारानंतर स्वामी बाबा देसाई यांच्या ' अनंत' निवासातील एका खोलीत वास्तव्य करू लागले. स्वामींची ' सोऽहम् ' साधना पूर्ववत चालू होती. आपणाला भगवंताचे सगुण दर्शन व्हावे अशी स्वामींना तळमळ वाटू

॥ ॐ ॥

श्रीभगवानुवाच–

माझे भक्ताची सांकडी । जो कोणी निजांगे दवडी ॥
त्यासी भवार्णवपरथडी । तात्काळ रोकडी मी पाववी ॥१॥
यापरी धनवंत जन । जो करी भक्त संरक्षण ॥
देवकीवसुदेवांचा आण । त्याचे उद्धरण मी करीन ॥२॥
सर्वांचे आपत्तीत रक्षण । रायें करावे आपण ॥
दीन दुर्बळ ब्राह्मण । अयाचित जन शोधूनी ॥३॥
करूनि प्रजांचे संरक्षण । आपल्या आपत्तीसी आपण ॥
स्वयें करावे निवारण ॥ हा स्वधर्म जाण राया ॥४॥

(एकनाथी भागवत अ. १७)

भगवंताचे भक्त म्हणजे कोण ? हा समाजपुरुषच नाही काय ?– की ज्याच्या उद्धारासाठी त्यानी अनेक अवतार घेतले. या समाजातील अज्ञान, दीनदौर्बल्य घालविणेसाठी ज्याने बुद्धी व संपत्तीचा सदुपयोग करून, समाजाचे संरक्षण केले. त्याचा उद्धार भगवंत स्वतः करतात किंबहुना समाज-सेवेने तो स्वतःच आत्मोद्धार करून घेत असतो हे भगवंतानी शपथपूर्वक सांगितले आहे. वरील ओव्यांचे मनन करून मी देवगड महाविद्यालयाच्या या सत्कार्याला सदिच्छा व्यक्त करतो



**गुरुनाथ शांताराम शिरसाट**

**दुकान, देवगड.**

लागली. ते या विचारानें बेचैन झाले. एकएक दिवस हरिच्या सगुण दर्शनाविना फुकट जाऊ लागला. त्यामुळे ते उदास बनले. अखेर तो भाग्याचा दिवस आला ! एका रात्रीं स्वामीं पलंगावर बसले असता १० च्या सुमारास एकदम दिव्य प्रकाश दिसून ध्वनी आला, 'वो गोडबोले किधर है। जिसनें ज्ञानेश्वरी लिखा।' व स्वामी पहातात तो चतुर्भूज भगवान विष्णूची मूर्ती पुढयात उभी स्वामी तात्काळ नतमस्तक झाले स्वामींना धन्यता वाटली. आपल्या भक्तीचे फळ त्याना मिळाले निर्गुणाने सगुणरुपाने त्यांना दर्शन दिले. व भगवान विष्णू अंतर्धान पावले. स्वामीजींची सारी तपश्चार्या आज फळास आली !

सगुण दर्शनानंतर स्वामींची कीर्ती सर्वत्र-पसरली. शिवाय स्वामींचे काव्य। स्वामींच्या काव्याचे, सपी व सुटसुटीत भाषा हे वैशिष्ठच होते. 'सांगे अग्निस्तव धूम होय। तिथे काय धूमी अग्नि आहे ! तैसा विकारू मी हा नोहे। जरी विकारीला असे ।। असे ते सहजतेने लिहून जातात. स्वामींनी अखेरपर्यंत आलेल्या सर्व भक्ताना भगवद्भक्तीचा उपदेश केला. त्यांच्या मुखावरील तेजाने सारे भक्त दिपून जात असत. भक्तांचे त्यांच्यावरील व्यक्त झालेलें प्रेम म्हणजे आज पावसेत डौलाने उभी असणारी वास्तु 'स्वरूपाश्रम' !' स्वामी हे चमत्कार वगैरे कांही दाखवित नसत. त्याला त्यांचा विरोध होता. परंतु काही चमत्कार योगायोगाने घडत. एखादी वस्तु खाण्याची इच्छा स्वामींना व्हावी आणि कुणीतरी भक्त ती वस्तु घेऊन येई असे बरेच वेळा घडे. ते घड्याळात न बघता वाजले किती ते अचूक सांगत. बाबा देसाई आप्पांच्या शेजारी (स्वामी) ठेवलेल्या गठ्ठ्यातून एखादा कागद काढून हातात घेत. तो त्या साकीचा नंबर स्वामी अचूक सांगत. कुणी विशेष योग्यतेचा पुरुष येण्यापूर्वी अर्धातास आपणाशेजारी त्याचे आसन घालून ठेवण्यास आणि अमूक जण येत आहे असेही सांगत, असो. सर्वसाधारण संतपुरुष हे शाळेत वा कॉलेजात गेलेले नसतात. परन्तु 'स्वरूपानंद' हे एक बी. ए. झालेले संत होते. सध्याच्या कॉलेज तरूण तरूणींना ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. शाळा कॉलेज करून, आपले कर्तव्यकर्म व्यवस्थित पार पाडून, देशसेवा करूनही ईश्वरप्राप्ती करुन घेता येते, आणि याचे उत्तम उदाहरण म्हणजे आमचे बी. ए. सन्त स्वामं स्वरूपानंद ! 'आम्ही कॉलेजात जाणारे, आंम्हाला कशी कशी देवप्राप्ती होणार ? एकसारखा नामजप केल्याशिवाय ईश्वर प्राप्ती कशी होणार ? संत शाळेत वा कॉलेजात न जाता एकसारखे ईश्वर चिंतनात मग्न असतात. मग आम्हाला हे कसे जमणार. आदि खुळचट कल्पना आपण सोडून देण्यास स्वरुप जीवनातून शिकले पाहिजे. 'कर्तव्यकर्म करीत राहील्याने ईश्वरप्राप्ती होते' हेच स्वरुप जीवन आपणास सांगते, अशाप्रकारे पावसचे पवनाजय, रसनाजय, निद्राजय मिळविलेले थोर संत पुरुष 'स्वामी स्वरुपानंद' ज्ञानेश्वरापासून त्यांच्या पंथातील १० वे साधु-पुरुष होत. त्यांच्या अवताराचे हे कार्य होते की लोकाना उपदेश करुन भगवद्भक्तीकडे प्रेरित

गणेश वॉच हाउस् चिंच नाका, चिपळूण

करणे. असा हा पावसचा प्रेमदीप, ज्याने ज्या भारतभूमीवर अपार प्रेम केले. जिच्या स्वातंत्र्यासाठी ज्याने आपला देह झिजविला अशा भारतभूच्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट १९७४ ला शांतपणे विझला. परंतु त्याचा सुगंध सर्वत्र भरून राहिला आहे तो अक्षय आहे. परन्तु आपण स्वरूपी मग्न होऊन तो घेतला तर तो आपणासही प्रेरक ठरेल. 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती' म्हणूनच मी स्वामीचरणी नतमस्तक होतो.

स्वामी स्वरूपानंद स्मृतीस उदंड प्रणाम !



आमच्या शुभेच्छा !

**न्यु शरदचन्द्र भांडी दुकान**

मेनरोड, देवगड.

तांबा, पितळ, ॲल्युमिनियम, प्लॅस्टिक, स्टोव्ह व स्पेअरपार्टस्, प्रेझेंटेशन आर्टीकल्स् वगैरे वस्तूंचे प्रमुख विक्रेते.

प्रोप्रा. एस् एम् घोरे

आमच्या शुभेच्छा—

**★ मे. भारत बुक डेपो ★**

**मेनरोड, देवगड**

( जि. रत्नागिरी )

-: बुक सेलर्स, स्टेशनर्स व जनरल डिलर्स :-

भरपूर स्टॉक, योग्य दर विनम्र सेवा हेच आमचे वैशिष्ठ्य !

# " WHAT I THINK OF POETRY."

By. Prof.- P. S. Gothoskar. M. A.

Not as an aesthete, but as a student of literature, I shall try to set forth some of my views on this subj ct.I hope that these views may prove of some interest to the reader. If they are linked together, they may represent an attempt on my part, to express my own views about the main characteristics of poetry. I am afraid, I shall not be as successful as great scholars, nor do I presume to believe that I am competent to fulfil most of the expectations of learned scholars

A poet requires a certain type of temperament which is peculiarly responsive to poetic impulses A poet is by nature intensely imaginative and keenly sensitive Because of this nature he is eminently fitted for poetry. His poems are his very soul. His heart beats in his poems. The personality of a great poet is always dissolved into his poems, to such an extent that he ceases to be a man, and becomes a voice a poem incarnate. A poet may reprsent in his poem, his highly ardent passion, his keen sensitiveness, his sense of personal rapture or sorrow. We find that great poets lend their voices, the sweetest and most liquid harmonies, not the most sonorous and sensual, but pure in their vehement intenisty. Sometimes a delicious sadeness emanates from these notes,now high, now, low but always poignant

Music is the most important characteristic of the best poem. A great poet always pants for the music and showers a rain of melody. " The vibration of rhythm in harmony with the vibration of emotion, is required to make a poem, impressive, appealing, and worthy of appreciation and admiration Great poems always possess an emotional ecstasy. Liquid sounds are used to suit that emotion. Parallelism beween emotion and expression is the secret of the best poem Sometime a poat is fired with some idealism, and this idealism becomes the cornerstone of his poetry. He becomes an idealist Sometimes he is dissatisfied with the prevailing social conditions of his times, The reality of the worldly life does not attract him. He cannot adjust himself to the ways of the world. Hence he produces an idealistic reaction against the realists of his times, He sings about ideal love, beauty, and joy and perfection. All that we see of love, beauty and joy in the

world, is only a pale shadow of the beauty, love and joy, which the poet concevies ideal. Our physical senses stand in the way of our perception and understanding of that supereme and ideal beauty and ideal love. We have to penetrate through the material world to the unchanging eternal world which lies behind the surface. A poet requires clarity of vision and logical consistency, in order to make us feel his experience.

When a poet labours under some idealism, he ceases to be a pure artist, and a pure poet. A pure poet is inspired by nothing else except artistic concept and consideration. He writes poetry for its own sake and refuses to subserve the cause of social and moral or political condition of the time. A very intelligent modern critic of literature may refuse to believe in moral or ethical ideas derived from metaphysical concepts. Our age is the age of pragmatism When we enquire into artistic activities, with a view based on pragmatism, we admire that activity which fits the modern trend. Beauty is synonymous with efficiency, and an object seems beautiful if it exclusively serves the purpose for Which it is designed. If a table is useful for writing arrangement, it is beautiful. A square peg must be designed for square holes



★ आमचे येथें सर्व प्रकारचीं छपाईची कामे
सुबक व वक्तशीर करुन मिळतील
★ तसेच सहकारी सोसायटचा व ग्रामपंचायती
याना लागणारी रजिस्टर्स व फॉर्म्स मिळण्याचे
देवगड मधील एकमेव ठीकाण
आकर्षक व नवनविन लग्न पत्रिकांसाठी
— आमचे प्रेसला अवश्य भेट द्या —

श्री गजानन प्रिंटिंग प्रेस
प्रिंटर्स, स्टेशनर्स ॲण्ड बुकबाइंडर्स
देवगड, जि. रत्नागिरी.

आमच्या शुभेच्छा !

मे. वामन यशवंत पोकळे
बर्माशेल डिलर्स
देवगड जि. रत्नागिरी

—: ब्रँच :—
पेट्रोल ॲण्ड डिझेल आईल पंप
कासार्डा, ता. कणकवली
जिल्हा रत्नागिरी

– आमच्या हार्दिक शुभेच्छा –

**पद्मप्रभा**
**स्टोअर्स**

कापड दुकान, देवगड.

आ म च्या शु भे च्छा !

**मे. लकी**
**स्टेशनरी मार्ट**
**दे व ग ड.**

मा.– मोर्ये ब्रदर्स

**आमच्या शुभेच्छा !**



मे. जोशी मत्स्योद्योग,
दे व ग ड.
जि. रत्नागिरी.

आमच्या शुभेच्छा !

उमर वझिर
टेलर
दे व ग ड.

**जेन्टस् टेलर्स**

आमच्या शुभेच्छा--

# अब्दूल सलाम सूलेमान होलसेकर

जेन्टस् टेलर्स, देवगड

उत्तम सुबक आधूनिक पद्धतीने योग्यवेळी कपडे शिवून दिले जातील.

---

आमच्या शुभेच्छा--

# समता उपहार गृह, देवगड

शाकाहारी व मांसाहारी जेवणाची आणि चहाफराळाची उत्तम सोय.

आमचे येथे ऑर्डर प्रमाणें माल तयार करुन योग्य दरात दिला जाईल.

प्रोप्रा. चोपडेकर बंधू, देवगड

---

आमच्या शुभेच्छा--

# मे. व्ही. आर. भिडये, मेनरोड, देवगड

आमचे येथे सर्व प्रकारचे मिलसचे कापड, प्रिंटेड साडया, ब्लाऊज पीसेस् धोतर-जोडया व तयार कपडे योग्य दरात मिळतील.

---

आमच्या शुभेच्छा-

# विकास रेस्टॉरंट, देवगड

आमचे येथे नेहमी ताजे व रुचकर चहाफराळाचे जिन्नस मिळतात तसेच ऑर्डर प्रमाणे माल तयार करुन मिळेल.

प्रोप्रा. पारकर बंधू, देवगड

and round pegs must be designed for round holes. This is the pragmatic theory of art, which has become highly poular in these days.

In these days of modern age, symbolism has gained immense popularity. Symbolism, in its broad sense, means the imagery, which the poet uses to express his abstract ideas. By the help of these symbols the poet may try to convey his abstract ideas to concrete things or objects But sometimes there are symbols of general nature with which a poet's poetry is strewn and adorned. Because of these symbols, difficulties, crop up in the proper understanding and appreciation of the poetry. Things are not clearly represented, or explicitly present. Behind the curtain of a symbol there lies dormant an inner idea of the poet.

But I come to this coclusion, that the poet is not content with the exterior of things, which his eyes see He possesses that exclusive and over-sensitive imagination, by the power of which, he can penetrate through the external phenomena and can seize in its purity, the rosy radiance of eternal reality. The poet considers the external objects, as ordinary clods of earth, as they mean to the people, who lack imaginative power The ordinary and common flwer of short-lived bloom can give him a message of

## घर की शक्ति

गढ धरा से बिलग हो,
हम् तो चल पडे अपनें धाम रे !
खुशी खुशी देना बिदाय,
स्वीकृत करना हमारा सलाम रे ॥
उरको गीला न करना,
चाहत ए खुदाके हम फिरसे आएंगे ।
कोकिला के गीत सुननें यहाँ,
हम संग सब खुशियाँ मनायेंगे ॥
होता है उर उदास हमारा,
न मालूम इस घरमें क्या शक्ती है ।
न मन होता विलग होनेको,
यहाँ छिपी ईश की अटूट भक्ति है ॥
मोह हो गया रजकण पावनसे,
तो क्यों न लगे मन मानवसे ।
कितना सुंदर भाग्य हमारा,
मिलन हुआ सूर मानवसे ॥
आम्र तरु मालासम शोभे,
नीले फल मोतीसम लटकें ।
मुँहसे टपके लार हमारे,
फिर क्यों कर मनपर घरपर भटकें ॥
तरती सागरमें नौकायें,
सागर का भाग्य जगाती है ।
छुपे गोदमें खजाने को यें,
जन जन के दिये जलाती है ॥
धन्य है धरणीपर यहाँ के,
सागर संग खुशियाँ मनाते है ।
चित के पावन दिल ए खजाना,
हम इनसें रुकसत चाहतें है ॥

कवी– इकबाल फ. कादरी.
प्रथम वर्ष वाणिज्य

WITH BEST COMPLIMENTS FROM

**NAIK FISHERIES**

**RATNAGIRI**

Office- 504
Resi- 540

Gram : Moonshine

आमच्या हार्दिक शुभेच्छा !

श्री

# उपहारगृह

शेठ म. ग. हायस्कूल समोर, **देवगड.**

चहा व फराळाचे ताजे व रुचकर जिन्नस मिळतात.

आमच्या शुभेच्छा—

मेसर्स- रानडे ब्रदर्स, जनरल मर्चंटस्
खारेपाटण. फोन नं ५

मेसर्स- रानडे ॲण्ड सन्स्, अडत दुकान
शाहूपुरी, दुसरी गल्ली, ६५५ ई वार्ड, कोल्हापूर.
☎ ३२३८

मेसर्स- रानडे ब्रदर्स, शाखा शिडवणे
ता कणकवली

आमच्या शुभेच्छा !

सर्वांच्या पसन्तीचा उत्कृष्ट कांचन व कोहिनूर चहा वापरा.

**मे. कृष्णा दत्तोबा डोर्ले**

खारेपाटण, फोन नं. ३
कोंडाघाट, फोन नं. २९

आमच्या हार्दिक शुभेच्छा

पंकजकुमार अमृत आणि कं.

इमारती लाकडाचे व
मंगळोरी कौलाचे व्यापारी
बाजार रोड. मु. पो. देवगड
जि. रत्नागिरी.

आमच्या शुभेच्छा

मे. नानकराम बी. लालवाणी

फॅन्सी कापड लुगडी व तयार कपडे
योग्य दरात मिळतील.

मु. पो. देवगड, जि रत्नागिरी

★ ★ ★

आमच्या शुभेच्छा

※ संतोष ध्वनी ※

देवगड

लग्न, मुंजी, पुजा, वगैरे-शुभ प्रसंगी
लाऊडस्पीकर भाड्याने मिळेल.
तसेच
आमचे येथे सर्वप्रकारचे इलेक्ट्रीक सामान
व सर्व प्रकारचे रिपेअरिंगचे काम माफक
दरात करून मिळेल.

प्रो. कुंडे बन्धू
देवगड

आमच्या शुभेच्छा

मनोहर भिकाजी मेस्त्री
देवगड.

सर्व प्रकारचे फर्निचर योग्य दरात व
सुबक रित्या तयार करुन मिळेल.

☆

eternity. A beautiful lotus flower, whose petals are slowly blooming may give him the fascinating idea of everlasting and ideal beauty.

However I believe that poetry is a matter of inspiration, and it can be composed only in the moments of rare inspiration. ' No man can say that he can compose poetry at order." When the poet is inspired. he is on a higher level, than the level of day to day life. Poetry can spring out of imagination. Order, harmony and rhythm should be its characteristics. The language should be elevated and elegant. Poetry can have a perceptible design and can function to promote the well-being of human society.

आमच्या शुभेच्छा–

कालेकर भिडे, दुकान वाडातर.

(स्थापना १९२३)

पो. जामसंडे, ता.देवगड. फो नं. १९

सर्वतऱ्हेचा किराणा भुसार माल, धान्य, घरगुती औषधे, जंतुनाशके वगैरे नित्योपयोगी माल खात्रीलायक आणि किफायतशिर भावात मिळण्याचे प्रमुख व्यापारी केंद्र.

आमच्या शुभेच्छा—



वैभव साडी भवन, राजापूर

[ जि. रत्नागिरी ]

रघुवीर खाडये व कमलाकर तोरगे

रा जा पू र ☎ ८१

*With Compliments From*

Shri : S. R. Mangaonkar.
C/o **Sudha Shankar**
**LABOUR ADVISOR**
Kasturchand Building,
Gokhale Road Sonth
**BOMBAY-28**

आमच्या शुभेच्छा-

मे. अमृत विष्णु नलावडे
जनरल मर्चंटस्, कमिशन एजंटस्
देवगड

आमच्याहि शुभेच्छा-

श्री. मेस्त्री जी. जी.
श्री. भोंसारी
श्री. डोळकर के. एस्.
श्री. कोरवी
श्री. कदम बी. एस्.

# फसवणूक– एक कला !!

वसन्त ऋतुचे दिवस होते. रसराजांच्या मादक गंधाने, श्वसनेंद्रिये, तृप्तीचा ढेकर उच्छवासाने देत होती. पश्चिमेचा रविराज विश्रांतीस्थळी निघण्यासाठी पूर्ववत लाल गुलाबी छटांचा वेष परिधान करण्यात गुंतला होता ! पक्षी, चिमणी– पाखरे दमलेल्या श्रमिकांप्रमाणेच घरे गाठायच्या गडबडीत होती. दारातल्या एका सुंदर, रंगमहालात बंदिस्त केलेल्या पक्षाने, उपजत गोड स्वरानें मित्र मंडळी आल्याची जाणीव करून दिली. आम्ही समवयस्क मंडळी, त्या मायावी पारतंत्र्यातील पक्षाच्या, मादक बोलण्यावर चर्चा करीत, मावतीच्या दिशेने पावले उचलू लागलो ! चालता...... चालता, योगायोगाने म्हणा अगर गारुडीवाल्याच्या सुदैवाने म्हणा मंत्रात जखडलेल्या प्रेक्षकांत आमचीही भर पडली. उत्सुक, हौशी आत्म्यांच्या टांचा, एकाहून एक उंच होत होत्या...... त्यांच्यातच, आमचीही स्वारी 'संजीवन सोडा – फॅक्टरीच्या' भितीला रेलून रंगात आलेला गारूडी – डाव एकाग्रतेने निरखित होती.

"शाबास मेरे दोस्त... शाबास भाऽय...
आज शनवार हैऽय ... ये शामका टेम है ...
ज्यो सापाच्या फडयावर लाथ मारून जाटल ...
तेच्या सपनमंदी हे भूत येटल ... शाबास ...
भाई साब" प्रत्येकजण मेंदूच्या परवानगीनें, बुद्धीच्या जुगाराला १०।२० पैसे उंच उंच फेकत होते. जणू शर्यत लागली होती...... दुनियेला लुबाडण्याची ... लुबाडून घेणाऱ्यांची बासरीवाल्यानें दोन पैशांची थाळी फिरवून देखील, मी हाताची घडी सोडवू शकलो नाही. कारण, मनमंदिराच्या रक्षकानी हाताच्या स्नायूना बेडचा घातल्या होत्या ; आश्चर्य, अगतिकता, संताप, या तिहींचे स्मित मुखावर उमलत होते ! पैसे न टाकल्याचे, लुबाडून न घेतल्याचे !!

---

लेखक– आत्माराम य. जाधव
(प्रथम व वाणिज्य)

---

दात पाडून, सामर्थ्य ... शक्ती ... स्वातंत्र्य ... तेजहीन केलेल्या, बिनविषारी जीवाचे प्रदर्शन करणाऱ्या, त्या (?) जीवाने पैशाने भरलेली थाळी जमिनीवर टेकताच... माझ्याकडे नजर रोखली. का ? ... कुणास ठाऊक ? अखेर या स्तब्ध, एकाग्र, कठोर नेत्रांकडे त्याला पाहवेना ... कारण अखेर त्या फसव्या, मंतरलेल्या, 'जादूमंतर छू' नयनांचा पराजय झाला होता. तेवढ्यात एका मित्राने, त्या गारुडीवाल्यास देण्यासाठी मला दहा पैसे देऊ केले परंतु अंगरख्याच्या खिशांतील कागदी नोट दाखविताच मित्राला हात खिशात ठेवावा लागला. अर्थात ... उधळपट्टीच्या क्षणिक रणांगणात, स्वभाव शस्त्रापुढे मित्राला ही पराजित व्हावे लागलें होते. गारुड्याला इशारा कळताच त्यानेही ओळखले, "काल ही मी या व्यक्ती समोरून दोन वेळा थाळी फिरविली, पण त्या पैशाच्या राशीवर केवळ स्मिताशिवाय याने काहीच फेकले नव्हते ..."

मी ही एक रसिकतेचा आस्वादी असल्या मुळे डंबरूच्या लयबद्ध ध्वनिनें, व बासरीच्या

कलात्मक स्वरांनी, माझे मन व देह आपोआप त्याच दिशेने वळले. गारुडीवाला ... विशेष बघायच ते काय? दोन जनावरं,... पत्त्याची पानं एखादे प्लॅस्टिक अंडे ... त्यामुळे कधीही पहा-वासा न वाटणारा हा खेळ मनाला थोपटीत, हातांना सावरीत, नेत्रांना समजावीत मुद्दामच काल पाहिला. कधीही विश्वासपात्र नसलेला 'ताईत' एक रुपया खर्चुन घेतला होता,...... केवळ अनुभव घेण्यासाठी ... निर्जीव वस्तूनें, अदभूत– सजीव स्वप्न सृष्टीवर हल्ला करण्यासाठी ! हो, सारे खटाटोप सुद्धा अगदी विधीपूर्वक... अगदी अचूकपणे ... यथावर्णन. सायंकाळी स्नान करून, अगरबत्तीचा धूर दाखविला ... कशानेतरी बंदीस्त केलेल्या त्या इंचभर– ताइताला ! मंतर घातल्याप्रमाणें दोन वेळा हात फिरविला ! या चमत्कारीक, नविनच कृत्यामुळे घरातील माणसे, शंकित मनानें माझ्याकडे पाहू लागली. बिचाऱ्यांना माझ्या डोक्याविषयी काही भलतेच वाटले असेल म्हणुन रात्री प्रथम 'डोके दुरुस्ती योजना' हाती घेतली. झोपतेवेळी डोकीखाली ताईत ठेवला, स्नायूंच्या व हाडाच्या बधिरतेच्या यातना सहन करीत बांधल्यागत खिळून राहीलो... देहाने अंथरूणाला व डोकीने ताईताला ! लहान मेंदूच्या सुस्त सागरावरचे, झोपेचे 'निद्रा – पवन' चाटून जाऊ लागले. पापणीला पापणी केव्हा भिडली व माझी या पृथ्वीवरुन केव्हा सुटका झाली, काही कळलच नाही. वर (स्वप्न – नगरीत) जाण्यापूर्वी 'स्वप्न– प्रतिबंधक' कायदा पास करूनच मी प्रवासाला निघालो होतो. पण ताइताच्या हातातील, मनःरथाच्या घोड्यांचे, विचाररुपी लगाम तुटले न् मी एका भयाण स्वप्न– सृष्टीत उतरलो.

"पंचविशी ओलांडलेला, मळकटलेल्या,


॥ श्री ॥

## आमच्या शुभेच्छा !

# मे. लक्ष्मण रघुनाथ जोशी

### व्यापारी, देवगड

(जि. रत्नागिरी)

आमच्या शुभेच्छा !

# शाम भास्कर लवेकर

ग्रामदेवीच्या चांदिच्या मूर्ती
व
फॅन्सी दागिनें तयार करणार.

चिपळूण (रत्नागिरी)

विक्राळ देहाला, चकचकणारे वस्त्र गुंडाळलेला, जटाधारी केसांना साजेसे, लालबुंद नेत्र विस्फारीत... सुराधारी मी एक वेडा झालो. हा हा म्हणता पाच मुडदे पाडले. त्याक्षणी मला काहीतरी मिळवायचे होतें,... माझ्या ध्येयपूर्तीसाठीं मी खुनो झालो .. एक विक्राळ, ओबडधोबड कसेचेच रूप माझ्या पदरी आले होते... धावत असता... रस्त्यानजिकच्याच... एका गवताने शाकारलेल्या झोपडीत शिरलो...! मादक सौंदर्याने, नसानसाला भारुन टाकणारीं, उफाळलेल्या यौवनातील एक युवती दिसली, तिच्या मोहक नेत्राना, नेत्र भिडवितांच, शेजारच्या लठ्ठ माणसाने कसलीशी खूण केली... नि... पाठलाग... धावत असताच त्या स्वप्नसुंदरीने धारदार चाकू माझ्या बाहुत खुपसला... का मारला ? तिलाच ठाऊक... मी, आईऽऽग म्हणून एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर रेललो... त्याच तरुणीच्या मुखातून कुणी तरी आक्रोश करीत असल्याचा भास झाला. अनेक स्वर गळ्यात गळा घालून रड होते "... डोळे उघडले. खिडकीतून पायाखाली असलेल्या भितीवर पडणाऱ्या प्रकाशात काळे-पांढरे अनेक आकार मला वेडावीत होते, सर्वांगाला दरदरून घाम आला. पायापासून डोकीपर्यंत पांघरूणाने वेढून घेतले... डोळे मिटू लागलो... अरे हो 'ताईत'! हाताने चाचपू लागलो... सापडला ! अहाहा!! तसाच त्याला घट्ट पकडून पुन्हा निद्रेकडे जाणाऱ्या ट्राम गाडीत विराजमान झालो. स्वप्नांची बरसात ...!!

आता मी शहाणा झालो होतो. एका सज्जनाच्या सेवेत माझं सर्वस्व गमावून बसलो. ध्यानी, मनी, एकच ध्यास, एकच चिंता... पुण्यकर्म ! क्षणार्धात त्या सज्जनाच्या रुपात मला

आमच्या शुभेच्छा–

कृष्णाजी हरि पाटणकर आणि कंपनी
रा जा पू र

स्टॉकिस्ट:– ब्रिटानीया बिस्कीटस, बॅसल मिशन कौले, डालडा, साबण वगैरे
किराणा व भुसारी मालाचें जूने व प्रसिद्ध व्यापारी

आमच्या शुभेच्छा–

★ मिरगल राईस व पोहा मील, चिपळूण
★ रामचंद्र मुकु मिरगल, चिपळूण
चणा चुरमुऱ्याचे घाऊक व किरकोळ व्यापारी,
★ प्रमोद फरसाण मार्ट, चिपळूण

# DEVGAD COLLEGE OF ARTS & COMMERCE. DEVGAD

## GYMKHANA & CULTURAL BOARDS. 1974—1975

President- Prin. G. G. Mayekar.
Chairman- Gymkhana Board- Prof. L. D. Golatkar.
Cultural Board- Prof. P. S. Gothoskar.

### Gymkhana Board

1) General Secretary- Malandkar A.L. F. Y. Com.
2) Lady's Representative- Miss Gogate S. J. F. Y. Arts.
3) Iindian Games- Karlekar V. V. F. Y. Arts
4) Foreign Games- Soman A. P. F. Y. Arts.
5) Atheletics- Patki V. S. F. Y. Com

### Cultural Board

1) General Secretary-Gogate P. P. F. Y. Com.
2) Lady's Representative- Miss. Joshi U. R. F. Y. Arts
3) Magazine- Jadhav A.Y.F.Y.Com.
4) Entertainment- Khanvilkar A. R. F. Y. Com.
5) Excersion- Karlekar V. V. F. Y. Com.
6) N. S. S. Boy's-Ranade A. G. F. Y. Com.
   Girl's-Miss Bhandari K. N. F. Y. Arts.
7) Study Circle- Joshi D. M. F. Y. Com
8) Debating- Malandkar A. L. F. Y. Com

बंधु आढळला ! कित्येक वर्षाच्या ताटातुटीमुळे उफाळलेल्या हर्ष दालनांत कडाडून भेटलो. त्याच क्षणी, बंधुत्वाची भेट ... 'अगठी' घेऊन मी घराच्या रोखाने चालू लागलो. आनंदाने बेभान होऊन स्वच्छदानें गाऊ लागलो... त्या धुंद मैफलीत बंधुत्व भेट विसरलोकी काय म्हणुन, डोळे उघडून पाहु लागलो... त्याच भितीवर रविराजाने उधळलेले सुवर्ण रंगाचे किरण विविध छटानी चमकू लागले... अगठी शोधू लागलो. अरे वा!! अंगठीचे रूपांतर 'ताईत' मध्ये झाले. हरकत नाही. अंथरूण उचलले. पण विचार चक्रावरील पट्टू, आपल्याच वेगात उलट-सुलट फिरत होते. सतत एकच भिती सर्वांगाला भेदून जात होती. रात्रभर खेळविलेले ते स्वप्न... 'असं कधी घडेल का माझ्या आयुष्यात ?'... पण मनमंदिरात 'उत्तर' नावाचे कुणी इसम नाहीत हे कळताच ते 'विचार' नि 'प्रश्न' रुपी लोक आत डोकावतीलच कशाला ? ते ही जिप्सी गाडले गेले होते -- मागील स्मृतींच्या अंधारात ! ताईत फेकून दिला -- दोन शिव्या हासडल्या- -- उगीचच ! आणि मित्रांच्या क्लबमधून सदस्य म्हणून आज फिरायला गेलो. तोच -- संजीवन सोडा फॅक्टरीच्या शेजारी चाललेला फसवणुकीचा डाव निरखण्यासाठी -- पुन्हा कधीही न- फसण्यासाठी -- लुबाडणाऱ्याला पुन्हा पुन्हा पहाण्यासाठी !!

"तो हात वर करा -- उजवा नाही- डावा --- नाही काय ? -- छे छे, त्या हाताखालीच आहे."

गारुड्याने लपविलेले अंडे त्या हाताखाली ही सापडेना -- पिशवी रिकामी, त्यामुळे प्रेक्षकाना कमालीचा धक्का बसला बाप -- रे बहुतेक भूतचेष्टाच असावी ही !! गारुड्याने

आमच्या हार्दिक शुभेच्छा-

भारत एजन्सीज, लक्ष्मीचौक रत्नागिरी

**अधिकृत जिल्हा विक्रेते-** ★ गोदरेज स्टील फर्निचर, टाईपरायटर्स, रेफ्रिजीरेटर्स
★ सिबा गायगी कंपनीची किटक नाशक औषधे ★ अस्पी फवारे पंप ★ बजाज, जि. ई.-सी. कंपनीचें सीलींग व टेबल फॅनस्, टयुबज्, वल्पज् इ.

आमच्या शुभेच्छा- दूरध्वनी : ५३

ऑटो पार्टस् कंपनी

**पेट्रोल व डिझेल मोटार इंजिनच्या सुट्या भागांचे विक्रेते**

**चिपळूण**, जिल्हा रत्नागिरी

अठरा मसनची राख ( माती ) व जादूची कांडी ( कोंबडीचे पाय ) तीनदा त्या पिशवीभोवती फिरविली. पिशवी झटकली. अरे वा ! अंडे बाहेर आले — —! लोकांची चुळबुळ सुरू झाली. एका निर्दुद्ध, व श्रीमंतीचे प्रदर्शन करणाऱ्या, वेडपटानें दोन रुपयाची नोट फेकली. — — — अहाहा ! निढळच्या घामाचा पैसा — — हवेवर तरंगला नि कायमचा त्या टोपलीत दडाला ! ! मला वाटत होते ... पिशवी हातात घेऊन त्यात लपविलेले अंडे साऱ्या आंधळ्यांना दाखवावे पण दुसरे मन दटावित होते — — — परमकर्तव्य — — " तू पैसे देऊ नकोस पण त्याला मिळणारे दाम परावृत्त करु नकोस." अच्छा ! राहिलो गप्प — — देणाराच खंबीर असेल तर घेणारा काय म्हणेल ? — — जाने दो.

